Process Safety Beacon

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx

उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक ioMosaic www.iomosaic.com

जून २०११

# नैसर्गिक आपत्तींसाठी सिद्ध आहात का?

भूकंप, वादळे आणि मोठी तूफाने, झंझावात, त्सुनामी, वणवे, जलप्रलय – आपण या सर्वांच्या आणि गेल्या काही वर्षांतील इतर नैसर्गिक आपत्तींच्या बाबतीतल्या बातम्या वाचल्या आहेत. या आपत्तींमुळे प्रत्यक्षपणे अपरिमित विध्वंस झाला. अशा आपत्तींचा घातक सामग्रींचा साठा व प्रक्रीया सुविधांवर संभवतः होऊ शकणाऱ्या आघातामुळे त्या अतिरीक्त नुकसानीस कारण होऊ शकतात. तुमच्या कारखान्यात कोणत्या प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती उद्भवू शकतात ते आपणास माहीत आहे का? अशा आपत्तींसाठी सिद्ध रहाण्यासाठी काय करावे आणि अशा आपत्ती येवून गेल्यावर पूर्वस्थिती कशी आणावी ते आपणास माहीत आहे का?

1



1 – मार्च 11, 2011 जपानमधील तोहोकूमध्ये झालेल्या भूकंपानंतर एका तेलखाणीला लागलेली आग
2 – टोर्नाडोमधील वावटळ; 3 – कॅलीफोर्नियातील वणवा; 4 – मार्च, 2011 च्या भूकंपानंतर फुकूशिमा अणू उर्जा प्रकल्पाची झालेली वाताहत

2



3



4



## आपणास माहीत आहे?

एफ एम ग्लोबल या जगातील सर्वात मोठ्या व्यावसायिक मालमत्ता विमा कंपन्यांमधील एका कंपनीने त्याच्या 2010 च्या "नैसर्गिक आपत्तींचा वरकरणी विचार" या अहवालात अनेक संस्था नैसर्गिक आपत्तींच्या बाबतीत पूर्वसिद्ध रहाण्यात का अपयशी होतात याची कारणमिमांसा दिली आहे. यातील काही निष्कर्ष असे आहेतः

- ➔लोकं नैसर्गिक आपत्तींच्या जोखमीला कमी लेखतात. ते समजतात की अशा आपत्ती त्यांच्याकडे घडणार नाहीत.
- ➔जो जो अशा आपत्तींविरहीत काळ वाढत जातो तो तो लोकांना अशा घटनेची शक्यता धुडकावणे सोपे जाते.
- ➔नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्याच्या स्वतःच्या तयारीबाबत कंपन्याना फाजील आत्मविश्वास असतो.
- ➔अनेक कंपन्या नुकसान कमी करण्याच्या दृष्टीने पूर्वानुमानित कृती करण्याऐवजी नैसर्गिक आपत्तीनंतरच्या पूर्वस्थिती आणण्यावर लक्ष केंद्रीत करतात.

## आपण काय करू शकता?

- ➔आपल्या संयंत्रावर नैसर्गिक आपत्तींचा प्रत्यक्ष काय परिणाम होईल आणि या आपत्तीमुळे अभियांत्रिकी सेवा विस्कळीत होण्याचा देखील काय परिणाम होईल हे जाणून घ्या.
- ➔आपल्या संयंत्राच्या नैसर्गिक आपत्तींसाठीच्या आणीबाणी नियंत्रण आराखड्याचा आढावा घ्या. हा आराखडा परीपूर्ण असल्याची खात्री करा – उपलब्ध वेळ आणि साधनसामग्रीतून आवश्यक उद्दीष्टे पूर्ण करता येतात का? यात तुम्हाला काही अडचण आल्यास आपल्या व्यवस्थापनास आपल्या चिंता कळवा.
- ➔नैसर्गिक आपत्तींसाठी सिद्ध रहाण्यासाठी व तिचा प्रतिकार करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व उपकरणे आणि वैयक्तिक सुरक्षा साधने सुस्थित ठेवली आहेत व वापरण्यायोग्य आहेत याची खात्री करा.
- ➔नैसर्गिक आपत्तींसाठी सिद्धता आणि प्रतिकार करण्यासाठीच्या प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी व्हा, ती गांभीऱ्याने घ्या आणि या प्रात्यक्षिकांदरम्यान काही तृटी आढळल्यास त्याची सूचना द्या.
- ➔एफ एम ग्लोबलचा अहवाल वाचण्यासाठी www.fmglobal.com/disaster या संकेतस्थळाला भेट द्या.

***"लहान प्रतिबंधात्मक उपाय हे मोठ्या उपचारांपेक्षा केंव्हाही योग्य!" बेंजामिन फ्रँकलिन***

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणी पुनर्विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org or २१२.५९१.७३१९

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.